**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात ६२ पूर्णांक २० शतांश टक्के मतदानाची नोंद / सहाव्या टप्प्यातला प्रचार थंडावला
- बुद्धपौर्णिमेनिमित्त राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन
- डोंबिवली इथं रसायनांच्या कंपनीत स्फोट होऊन लागलेल्या आगीत ७ जणांचा मृत्यू, तर किमान ५६ जण जखमी / दुर्घटनेच्या चौकशीचे आदेश

  **आणि**
- काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पी एन पाटील यांना अखेरचा निरोप

**<><><><><>**

लोकसभा निवडणूकीसाठी २० मे रोजी झालेल्या पाचव्या टप्प्यातल्या मतदानात एकूण ६२ पूर्णांक २० शतांश टक्के मतदानाची नोंद झाली आहे. यापैकी सुमारे ६१ पूर्णांक ४८ शतांश टक्के पुरुष मतदार, ६३ टक्के महिला मतदार तर २१ पूर्णांक ९६ शतांश टक्के तृतीयपंथी मतदार होते. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार सर्वाधिक महिला मतदारांची नोंद पश्चिम बंगाल मध्ये ७८ पूर्णांक ४३ शतांश टक्के इतकी झाली असून त्या पाठोपाठ ओदिशामध्ये ७४ पूर्णांक ७७ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली.

महाराष्ट्रात सर्वात कमी म्हणजे ५५ पूर्णांक ३२ शतांश टक्के महिलांनी मतदान केल्याची नोंद झाली असून जम्मू आणि काश्मीरमध्ये ५५ पूर्णांक ६३ टक्के महिलांनी मतदान केल्याची नोंद आहे. पाचव्या टप्प्यात एकूण ६९५ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. या टप्प्यात उत्तर प्रदेशात १४, महाराष्ट्रात १३, पश्चिम बंगालात ७, ओदिशा आणि बिहारमध्ये प्रत्येकी ५, झारखंड मध्ये ३ तर जम्मू

काश्मीर आणि लडाख या केंद्रशासित प्रदेशात प्रत्येकी एका जागेसाठी मतदान झालं.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यातला प्रचार आज संपला. या टप्प्यात उत्तर प्रदेशातल्या १४, हरयाणातल्या १०, हिमाचल प्रदेशातल्या ४, बिहारमधे ८, आणि उत्तराखंडमधे ८, आणि ओदिशातल्या ६ अशा एकूण ५७ मतदारसंघांमध्ये येत्या शनिवारी मतदान होणार आहे. याखेरीज जम्मू काश्मीरमध्येही अनंतनाग-राजौरी मतदारसंघात शिल्लक राहिलेलं मतदान शनिवारी होणार आहे. या ५८ जागांसाठी एकोणनव्वद उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. आजच्या शेवटच्या दिवशी मतदारांना आकर्षित करण्यासाठी सर्वच पक्षांनी निकराचा प्रयत्न केला.

<><><><><>

सातव्या आणि अखेरच्या टप्प्यात देशातल्या ५७ मतदारसंघांमधे येत्या एक जूनला मतदान होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाराणसी मतदारसंघाचा त्यात समावेश आहे. या टप्प्यातल्या प्रचारालाही जोर आला असून विविध नेत्यांच्या जाहीर सभा होत आहेत.

<><><><><>

वैशाख पौर्णिमा म्हणजेच बुद्ध पौर्णिमा आज देशाच्या विविध भागात साजरी झाली. भगवान बुद्धांचा जन्मदिवस आणि त्यांच्या ज्ञान प्राप्तीचा हा दिवस त्यांच्या शिकवणीचं स्मरण करुन साजरा करण्यात आला. तथागत गौतम बुद्धांशी संबंधित स्थळांवर भाविकांची गर्दी झाली होती. विविध ठिकाणी बुद्धमूर्तींच्या मिरवणुका

काढण्यात आल्या. तसंच विशेष प्रार्थना आणि प्रवचन कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

नागपूरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या वतीनं दीक्षाभूमी इथल्या तथागत बुद्ध आणि डॉ बाबासाहेबांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर बुद्ध वंदना घेण्यात आली.

बुद्ध पौर्णिमेच्या निमित्तानं हिंगोली शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळा येथून रॅली काढण्यात आली. अनेक भंतेंसह शुभ्र वस्त्र परिधान केलेले उपासक, उपसिका मोठ्या संख्येनं रॅलीत सहभागी झाले होते.

बुद्ध पौर्णिमेनिमित्त बुलडाण्यातल्या गारडगाव तथागत विहारात बुद्ध उपासकांनी धम्मवंदना केली तसंच बौद्ध अनुयायांनी भगवान बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली.

गडचिरोलीतही आज विविध संघटनांनी अनेक कार्यक्रम आयोजित केले होते. बौद्ध महासभेनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केलं. तर काँग्रेसच्या अनुसूचित जाती आघाडीनं गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली.

बुद्ध पौर्णिमेनिमित्त यवतमाळ जिल्ह्यातल्या राळेगाव तालुक्यात, आदिवासींची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जागजई इथं गोंडवाना आदिवासींची यात्रा भरली होती. शेकडो वर्षांपासून वर्धा नदीत काळा चौरव, पांढरा चौरव या देवांना आंघोळ घालण्याची प्रथा इथं पाळली जाते. या यात्रेच्या निमित्तानं आदिवासी बांधव आपल्या संस्कृतीचं दर्शन घडवतात.

**<><><><><>**

चंद्रपूरातल्या प्रसिद्ध ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमध्ये आज बुद्ध पौर्णिमेला चंद्र प्रकाशात प्राणीगणना केली जाणार आहे. निसर्ग अनुभव या नावानं ओळखल्या जाणाऱ्या या उपक्रमाविषयी अधिक माहिती देत आहेत आमचे प्रतिनिधी मंगेश बेले….

**(होल्ड : व्हॉइस कास्ट )...**

**<><><><><>**

नरवीर चिमाजी आप्पा यांनी पराक्रम गाजवून जिंकलेल्या वसईच्या किल्ल्याचा २८६वा विजय दिन आज साजरा होत आहे. दरवर्षी बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी हा दिवस साजरा होतो. वसईच्या किल्ल्याचा इतिहास, इथलं पर्यटन, लोकसंस्कृती, खाद्यसंस्कृती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवणं हा, वसई विजयोत्सव दिन नावाच्या या एक दिवसीय कार्यक्रमाचा उद्देश आहे.

**<><><><><>**

पश्चिम रेल्वेच्या विरार-वैतरणा रेल्वे स्थानकांदरम्यान स्टील गर्डर बदलण्यासाठी ब्लॉक घेतला जाणार आहे. उद्या रात्री १० वाजून ५० मिनिटांपासून परवा पहाटे ४ वाजून ५० मिनिटांपर्यंत हा ब्लॉक असेल. यामुळे, पश्चिम रेल्वेच्या काही गाड्या पूर्णतः तर काही आंशिक स्वरूपात रद्द केल्या असून काही गाड्यांच्या वेळा बदलल्या आहेत तर काही रेल्वेगाड्या कमी अंतरापर्यंत चालवल्या जाणार आहेत. पश्चिम रेल्वेच्या जनसंपर्क विभागाने ही माहिती दिली आहे.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यात डोंबिवली इथं औद्योगिक वसाहतीतल्या रसायनांच्या कंपनीत स्फोट होऊन लागलेल्या आगीत ७ जणांचा मृत्यू झाला तर किमान ५६ जण

जखमी झाले आहेत. जखमींना वेगवेगळ्या रुग्णालयात भरती करण्यात आलं आहे. घटनास्थळी अग्निशमन दल, आपत्ती प्रतिसाद दल तसेच वैद्यकीय पथक दाखल झालं असून बचावकार्य वेगाने सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं असून या दुर्घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. या दुर्घटनेला जे कुणी जबाबदार असतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल, असं त्यांनी सांगितलं.

<><><><>

अहमदनगर जिल्ह्याच्या अकोले तालुक्यात सुगाव जवळ प्रवरा नदीत नाव उलटून झालेल्या दुर्घटनेत एनडीआरएफ च्या पथकातील ३ जवानांचा बुडून मृत्यू झाला. नावेतील आणखी एक स्थानिक आणि इतर दोघांचाही बुडून मृत्यू झाल्यानं या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या ६ झाली आहे. प्रवरा नदीच्या सुगावजवळ काल संध्याकाळी दोघेजण बुडाले होते. त्यातील एकाचा मृतदेह काल काढण्यात आला. आज सकाळी दुसऱ्या व्यक्तीच्या मृतदेहाचा शोध घेतांना ही दुर्घटना घडल्याची माहिती राष्ट्रीय आपत्ती निवारण दलानं दिली.

<><><><>

मुंबईत घाटकोपर इथं जाहिरात फलक दुर्घटनेनंतर नवी मुंबई महापालिका क्षेत्रात परवाना विभाग तसंच अतिक्रमण विभागाने ३४ होर्डींग्जवर कारवाई केली आहे. सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रांत होर्डिंग्जच्या सर्वेक्षणानंतर ३१ होर्डिंग्ज अवैध असल्याचं निदर्शनाला आलं असून ती हटवण्याचं काम अतिक्रमण विभागाने सुरू केलं आहे.

<><><><>

मुंबई शेअर बाजारात आज सुरुवातीच्या घसरणीनंतर विक्रमी तेजी दिसून आली. औषधे, धातू वगळता इतर सर्व क्षेत्रातले समभाग तेजीत राहिले. बाजार उघडताना सुरु झालेल्या विक्रीमुळे निर्देशांक घसरला. पण त्यानंतर दिवसभर खरेदी सुरु राहिल्यानं सेन्सेक्सने ७५ हजारांचा टप्पा ओलांडला आणि जवळपास ७५ हजार ५००ची विक्रमी पातळी गाठली. पण त्यानंतर थोडी घसरण होऊन बाजार बंद होताना तो ७५ हजार ४१८ पूर्णांक चार शतांशवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही अशाच प्रकारची विक्रमी वाढ दाखवत २२हजार ९६७ पूर्णांक ६५ शतांश वर बंद झाला.

<><><><><>

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि करवीरचे आमदार पी. एन. पाटील यांच्या पार्थिवावार आज दुपारी कोल्हापूर जिल्ह्यात सडोली खालसा या त्यांच्या गावी शासकीय इतमामानं अंतिम संस्कार करण्यात आले. दिवंगत नेत्याला अखेरचा निरोप देण्यासाठी यावेळी शोकाकुल कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. पी एन यांचं आज पहाटे निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते. १९७८ ते १९८५ या काळात जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी कारकिर्दीची सुरुवात केली होती. त्यानंतर जिल्हा अध्यक्ष, प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष अशा जबाबादाऱ्याही त्यांनी सांभाळल्या.

पी. एन. पाटील यांच्या जाण्याने एक सहृदयी नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले असल्याची भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली, तर पी एन पाटील यांच्या निधनाने कोल्हापूरच्या सामाजिक, राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तीव्र दु:ख व्यक्त करुन श्रद्धांजली वाहिली.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी पाटील यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

<><><><><>

दक्षिण अरबी समुद्राच्या आणि मालदीवच्या काही भागात, कोमोरिन क्षेत्र आणि दक्षिण बंगालच्या उपसागरात तसंच अंदमान-निकोबार बेटं आणि अंदमान समुद्राच्या काही भागांमधे आज नैऋत्य मोसमी पाऊस सुरु आहे. येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. या काळात मराठवाड्यात हवामान कोरडं राहण्याची शक्यता आहे.